प्रेसनोट

पोलीस उप-आयुक्त वाहतुक नियंत्रण शाखा, पुणे शहर

पुणे, दिनांक - २६/१०/२०१८

अंतिम आदेश क्र. पोउआ/वाहतुक/ ८६ /२०१८

आदेश

ज्याअर्थी पुणे शहरातील खालील ठिकाणी वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे चालणे इष्ट आहे, त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन **जा.क्र./पोउआ/१००८५/१८ दि.०१/१०/२०१८** अन्वये पुणे शहरात लक्झरी बसेस यांना सकाळी ०६.०० ते रात्री २२.०० वा चे पर्यंत प्रवेश बंद करण्यात आला होता व रात्री २२.०० ते सकाळी ०६.०० या वेळेत प्रवेश करण्याबाबत तात्पुरत्या स्वरुपात आदेश निर्गमित करण्यात आलेले होते. त्याबाबत प्रेसनोट प्रसिध्द करुन **दिनांक ०१/१०/२०१८ ते १५/१०/२०१८** या कालावधीत लेखी स्वरुपात सुचना व हरकती कळविण्यास प्रसिध्द केले होते.

सदर संबंधाने प्राप्त झालेल्या सुचना व हरकती तसेच, दि.१७/१०/२०१८ रोजी ट्रव्हल्स असोसिएशन यांच्या सोबत झालेल्या मिटिंगमधील चर्चा व पुणे शहरातील वाहतुक समस्या याचा विचार करुन मी तेजस्वी सातपुते पोलीस उप-आयुक्त, वाहतुक नियंत्रण शाखा, पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून खालीलप्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करीत आहे. सदर बाबत यापुर्वी असलेले निर्बंध रद्द समजण्यात येतील.

१) पुणे शहरामध्ये येणा-या-जाणा-या लक्झरी बसेस यांनी पुणे शहरात ये-जा करण्यासाठी खालील मार्गाचा वापर करावा.

| अ क्र | पुणे शहरातुन बस सुटण्याचे ठिकाण | इच्छित ठिकाण | मार्ग |
|---|---|---|---|
| १. | **स्वारगेट, व्होल्गा चौक** | **सातारा** | १. व्होल्गा चौक-मार्केटयार्ड चौक-सातारा रोड-कात्रज जंक्शन-नवले ब्रीज-वडगाव ब्रीज-वारजे- चांदणी चौक हायवे.<br>२. व्होल्गा चौक- सातारा रोड- मार्केटयार्ड चौक- कात्रज चौक- हायवे. |
| | | **सोलापुर** | व्होल्गा चौक- सातारा रोड- मार्केटयार्ड चौक - वखार महामंडळ चौक –गंगाधाम चौक - लुल्लानगर चौक - वानवडी पोलीस चौकी - भैरोबानाला- पेट्रालपंप युटर्न - सोलापुर रोड. |
| २. | **संगमवाडी, पुणे** | **अहमदनगर** | संगमवाडी- शहादवलबाबा- तारकेश्वर चौक- पर्णकुटी- शास्त्रीनगर चौक- नगररोड |
| | | **नाशिक** | संगमवाडी- पाटील इस्टेट- खडकी रोड (ब्रीज खालुन)- पोल्ट्री फार्म- चर्च चौक- नाशिक फाटा- नाशिक रोड. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मुंबई | संगमवाडी- संचेती चौक- स.गो.बर्वे चौक- सिमला ऑफिस चौक- ब्रीजवरुन गणेशखिंड रोड- ब्रेमेन चौक- नदीक्रॉस करुन पीसीएमसी. |
| ३. | निगडी | सोलापुर | बोपोडी चौक- पोल्ट्री फार्म चौक-संगमवाडी- शहादवलबाबा- पर्णकुटी चौक- सर्किट हाऊस चौक- मोरओढा चौक- एम्प्रेस गार्डन चौक- भैरोबानाला- सोलापुर रोड. |

वरील मार्गाव्यतिरिक्त लक्झरी बसेस इतर कोणत्याही मार्गाचा वापर कोणत्याही वेळेत करणार नाहीत. वरील मार्ग वगळता इतर सर्व ठिकाणी लक्झरी बसेसना बंदी असेल.

२) वरील मार्गावरील लक्झरी बसेस यांनी खालीलप्रमाणेच लक्झरी बस थांब्याचा वापर करावा.

| | | |
|---|---|---|
| १. | **स्वारगेट ते सातारा रोड** | १. पद्मावती- अण्णाभाऊ साठे सभागृह याठिकाणी जास्तीत जास्त ०४ बसेस एका वेळी थांबतील.<br>२. कात्रज सर्पोदयान - याठिकाणी जास्तीत जास्त १० लक्झरी बसेस थांबतील. |
| २. | **पुणे-मुंबई रोड** | १. पद्मावती- अण्णाभाऊ साठे सभागृह याठिकाणी जास्तीत जास्त ०४ लक्झरी बसेस एका वेळी थांबतील.<br>२. कात्रज सर्पोदयान - याठिकाणी जास्तीत जास्त १० लक्झरी बसेस एका वेळी थांबतील.<br>३. चांदणी चौक बसस्टॉप येथे रनिंगमध्ये जास्तीत जास्त १ मिनिटासाठी थांबवण्यात याव्यात. |
| ३. | **पुणे - सोलापुर रोड** | लुल्लानगर जवळ जकात नाका (कॅन्टोमेंट टोल नाका) व येताना नेताजी नगर जवळ एका वेळी जास्तीत जास्त ०२ लक्झरी बसेस थांबतील. |
| ४. | **पुणे नगर रोड** | वाघोली (शहादावलदर्गा ते तेलाची मोरी पर्यंत कोठेही थांबु नये) |
| ५. | **पुणे नाशिक रोड** | दापोडी (बोपोडी ते पाटील इस्टेट या दरम्यान कोठेही थांबु नये) |
| ६. | **पुणे मुंबई रोड** | पीएमआरडीए समोर |

सदर थांब्यावर लक्झरी बसेस या २ मिनिटापेक्षा जास्त वेळ थांबता येणार नाही. जेणेकरुन दिलेल्या मर्यादेपेक्षा जास्त बसेस एका वेळी दिलेल्या थांब्यावर उभ्या राहणार नाहीत.

पुणे शहरामध्ये येणा-या-जाणा-या लक्झरी बसेस यांना सकाळी ०८.०० ते १२.०० व सायंकाळी १७.०० ते २१.०० वाचे दरम्यान ठरवुन दिलेल्या मार्गावरही प्रवास करणेस बंदी करण्यात येत आहे.

सही/-

(तेजस्वी सातपुते)

पोलीस उप-आयुक्त, वाहतुक

पुणे शहर